पोलीस स्टेशन सेवली जि.जालना

M.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. District (जिल्हा): जालना    P.S.(ठाणे): सेवली

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0009    Year (वर्ष): 2024

Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):01/02/2024 03:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलमे) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) Occurrence of offence (गुन्हाची घटना):

1. Day(दिवस): बुधवार    Date From (दिनांक पासून): 31/01/2024
Time Period (कालावधी): प्रहर 5    Date To (दिनांक पर्यंत): 31/01/2024
Time From (वेळेपासून): 14:23 बजे
Time To (वेळेपर्यंत): 14:23 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

Date (दिनांक): 01/02/2024    Time (वेळ): 03:22 बजे

(c) General Diary Reference (रोजनाम्चा संदर्भ):

Entry No. (नोंद क्र.): 003

Date & Time (दिनांक आणि वेळ): 01/02/2024 03:22 बजे

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पूर्व, 10 किमी    Beat No. (बिट क्र.):

(b) Address (पत्ता): [illegible] चौफुली,मंठा

(c) In case, outside the limit of this Police Station, then
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):

District(State) (जिल्हा(राज्य)):

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

**(a) Name** (नाव): राजु विष्णुपंत शिंदे

**(b) Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

**(c) Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992

**(d) Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

**(e) UID No.** (यु.आय.डी. क्र.):

**(f) Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving Licens PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅ )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | दुधा,मंठा जि जालना ,शेवली,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | दुधा,मंठा जि जालना ,शेवली,जालना,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation** (व्यवसाय):

**(j) Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9403449403

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माही असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गजानन अबादास नागरे | पोहेका603 | | 1. पोलीस ठाणे सेवली,ता जालना ,शेवली,जालना, भारत |
| 2 | प्रल्हाद ज्ञानेश्वर भानुसे | पोकॉ447 | | 1. पोलीस ठाणे सेवली,ता जालना ,शेवली,जालना, भारत |
| 3 | प्रदिप भगवान खंदारे | वागन | | 1. किर्ला,ता मंठा जि जाल शेवली,जालना,महाराष्ट्र, |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/म देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | अँथ्रासिन पावडर लागलेली 15,000 रुपये लाचेची रक्कम | 15,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र., जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 01/02/2024.
फिर्याद
मी, राजु विष्णुपंत शिंदे, वय-32 वर्ष,व्यवसाय-शेती व वाळु वाहतुक रा.दुधा ता.मंठा जि.जालना. मो.क्र. 9403449403.

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी राहणारा असुन शेती व वाळु वाहतुकीचा व्यवसाय करतो. मी दिनांक-24/01/2024 रोजी पंचासमक्ष पोलीस निरीक्षक, श्री.मुटेकर साहेबांना तक्रार दिली होती की, मी व माझा मोठा भाउ अशोक शिंदे असे एकत्रीत राहण्यास आहे. आम्ही दोघे खडकपुर्णा नदी पात्रातुन वाळु वाहतुकीचे काम करतो. आमच्याकडे दोन टिप्पर आहेत. त्याचा नंबर MH-21-BH-6564 व आठ दिवसापुर्वी एक नविन टिप्पर विकत घेतला असुन त्याचा नंबर अदयाप मिळालेला नाही.
दिनांक 23.01.2024 रोजी रोजी रात्री 09.00 वाजता मोठा भाउ अशोक शिंदे याच्या सांगण्यावरुन टिप्परचा ड्रायव्हर अमोल खंदारे आमचा टिप्पर क्रमांक MH-21-BH-6564 घेवुन वाळु एजंट आनंता जावळे याचे सोबत टिप्पर मध्ये वाळु भरण्यासाठी पुर्णा नदि पात्रात गेला. त्या ठिकाणी टिप्पर मध्ये वाळु भरुन वाळुचा टिप्पर सेवली येथे घेवुन जात असताना वाळुचा,टिप्पर सेवली पोलीसांनी पकडुन त्यावरती गुन्हा दाखल केला. त्याबाबतची माहीती मला मोठा भाउ अशोक उर्फ बंडु शिंदे याने फोन व्दारे दिली. त्यानंतर दिनांक 24.01.2024 रोजी पहाटे 01.00 वा ते 01.30 वा चे दरम्यान मी सेवली पोलीस स्टेशन येथे गेलो. त्यावेळी मला समजले की, आमचा वाळुचा टिप्पर पकडल्यानंतर भाउ अशोक उर्फ बंडु शिंदे, टिप्परचा ड्रायव्हर अमोल खंदारे व वाळु ऐजंट आनंता जावळे यांच्यावरती गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर सकाळी 10.30 वा चे सुमारास मोठा भाउ अशोक शिंदे याचे सांगण्यावरुन मी सेवली पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार श्री. पवार यांना भेटलो त्यावेळी त्यांनी मला तुमच्या गुन्हयाचा तपास बिट जमादार श्री. नागरे साहेब यांच्याकडे आहे असे सांगीतले. त्यानंतर मी वाळुच्या टिप्पर सोबत पकडलेल्या ड्रायव्हर अमोल खंदारे व वाळु एजंट आनंता जावळे यांना भेटलो. त्यावेळी आनंता जावळे याने सांगीतले की, त्याला बिट जमादार नागरे साहेब व भानुसे साहेब यांनी आमचा जामिन करण्यासाठी 15,000/- हजार रुपये मागीतले आहेत असे सांगीतले. त्यानंतर मी सेवली पोलीस स्टेशन येथे बीट जमादार नागरे साहेब व भानुसे साहेब यांची भेट घेतली असता ते मला म्हणाले की, अशोक शिंदे याची जामिन करुन गुन्हयाच्या तपासात मदत करतो असे म्हणुन भानुसे साहेब यांनी नागरे साहेब यांचे समक्ष त्यांचे मोबाईलवरती 15,000/- हजाराचा आकडा टाईप करुन मला 15,000 /- रुपये लाचेची मागणी करुन संध्याकाळी पैसे घेवुन येण्यास सांगीतले. त्यांनी माझ्याकडे मागीतलेले पैसे लाचेचे असल्यामुळे मी त्यांना सध्या माझ्याकडे पैसे नाहीत घरुन घेवुन येतो असे सांगुन घरी आलो. घरी आल्यानंतर मी माझ्या मेल वरुन ACB छत्रपती संभाजीनगर येथे सेवली पोलीस जामिन करण्यासाठी पंधरा हजार रुपयाची मागणी करत असल्याबाबत मेल व्दारे तक्रार केली. तसेच माझा भाउ अशोक शिंदे याने त्याच्या मोबाईल वरुन ACB छत्रपती संभाजीनगर येथे फोन करुन सेवली पोलीस जामिन करण्यासाठी पंधरा हजार रुपयाची मागणी करत असल्याबाबत सांगीतले. त्यानंतर काही वेळात माझ्या भावाच्या मोबाईल वरती ACB जालना येथील पोलीस निरिक्षक श्री. मुटेकर यांचा फोन आला. त्यावेळी त्यांना घडलेल्या घटनेबाबत हकीकत सांगुन आमची तक्रार घेण्यासाठी त्यांना जालना- मंठा रोडवरील वाई फाटा येथे येण्यास सांगीतले. त्यानंतर काही वेळाने पोलीस निरिक्षक

श्री. मुटेकर हे त्यांचे पथकासोबत त्या ठिकाणी आले. त्यावेळी त्यांना मी घडलेली सविस्तर हकीकत सांगीतली. आम्हाला बिट जमादार नागरे साहेब व भानुसे साहेब मागत असलेले पैसे लाचेचे आहेत. त्यांच्या मध्ये व माझ्या म उसनवारीचा कोणताही व्यवहार झालेला नाही तसेच आमच्या मध्ये कोणत्याही प्रकारचा भांडण तंटा झालेला नाही तरी आज दिनांक 24.01.2024 रोजी पोलीस स्टेशन सेवली येथील बिट जमादार नागरे साहेब व भानुसे साहेब यांनी माझा मोठा भाऊ अशोक शिंदे याचे जामिन करुन गुन्हयाच्या तपासात मदत करतो असे म्हणुन भानुसे साहेब यांनी नागरे साहेब यांचे समक्ष त्यांचे मोबाईलवरती 15,000/- हजाराचा आकडा टाईप करुन मला 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन संध्याकाळी पैसे घेवुन येण्यास सांगीतले आहे. त्यामुळे मी आज सेवली पोलीस स्टेश येथे जावुन बिट जमादार नागरे साहेब व भानुसे साहेब यांना भेटुन माझ्या भावाचे जामिनाबाबत बोलणार आहे. त्यावेळी त्यांनी स्वता अथवा इतरा मार्फत मला लाचेची मागणी केल्यास त्यांच्यावरती कायदेशीर कारवाई करावी अशी लेखी तक्रार दिली. सदरची लेखी तक्रारी बरोबर मी माझा भाऊ अशोक शिंदे ह्याचे विरुद्ध पोलीस ठाणे सेवर येथे दाखल असलेला व बिट जमादार श्री.नागरे साहेब यांचेकडे तपासावर असलेला गुन्हा नोंद क्रमांक-04/202 कलम 379, 186, 279, 34 भादवी सह कलम 3 व 4 गौण खनिज अधिनियम-1952 या गुन्ह्याची एफ.आर. ची झेरॉक्स प्रत पोलीस निरीक्षक मुटेकर साहेब यांचेकडे दिली होती. त्यानंतर मी बिट जमादारनागरे व भानुसे सा यांचे विरुद्ध दिलेली तक्रार खरी आहे काय ? व ते मला लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी दिनांक-24/01/2024 रोजी लाच मागणी पडताळणी केली असता भानुसे व नागरे साहेब यांनी दिनांक-25/01/2024 रोजी पोलीस ठाणे सेवली येथे भेटण्यास बोलाविले होते. त्यावरुन दिनांक-25/01/2024 रोजी लाचमागणी पडताळणी करण्यासाठी मुटेकर साहेब हे त्यांच्या पथकासह सेवली गावाजवळ सावरगाव भागडे रोडवर आले. त्या ठिकाणी मला पंचांना सुचना दिल्या. त्यानंतर माझ्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री. मुटेक यांनी त्यांच्या बॅग मधुन एक नवीन मेमरी कार्ड काढुन डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मशिन मध्ये टाकुन व्हाईसरेकॉर्डींग चालु करुन व्हाईस रेकॉर्डींग मशिन कोणालाही दिसणार नाही अशा रितीने माझ्या बनियनला आतील बाजुस बांधले त्यानंतर मी, माझ्या सोबत पंच क्र. 01 श्री. अरुण राकडे असे आम्ही दोघजन पोलीस ठाणे सेवली येथे गेलो अस त्या ठिकाणी बिट जमादार नागरे साहेब व भानुसे साहेब भेटले असता ते मला म्हणाले की आधी तुझा भाऊ अशोक शिंदेला पोलीस ठाणेला घेऊन ये असे म्हणाले त्यावर मी व पंच क्र. 01 श्री.अरुण राकडे असे दोघेजन पोलीस निरीक्षक श्री.मुटेकर साहेब यांचेकडे परत आलो. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर मी माझा भाऊ अशो शिंदे यास फोन द्वारे संपर्क करुन पोलीस ठाणे सेवली येथे येण्यास सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक मुटेकर साहेब यांनी पुन्हा व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्या पॅन्टच्या आतीलबाजुस करदोड्याला बांधुन मला व पंच क्रमां 01 श्री. अरुण राकडे यांचे सह माझ्या जवळील स्विफ्ट डिझायर कारने पोलीस स्टेशन सेवली येथे पाठविले. त्या ठिकाणी माझा भाऊ अशोक शिंदे आला होता. माझ्या भावासह मी व पंच क्रमांक 01 श्री.अरुण राकडे असे पोली ठाणे सेवली येथे बिट जमादार नागरे व भानुसे यांना त्यांच्या कक्षात जाऊन भेटलो. त्या ठिकाणी माझे व माझा भ अशोक शिंदे यांचे पोलीस अंमलदार श्री.भानुसे यांच्या सोबत वाळुच्या गाडीबाबत व गाडीच्या कागदपत्राबाबत बोल झाले. तसेच बिट जमादार श्री.नागरे यांचे सोबत माझा भाऊ अशोक शिंदे यांच्या जामिनाबाबत बोलणे झाले. त्य वेळी बिट जमादार श्री. नागरे यांनी माझा भाऊ अशोक शिंदे यांची जामिन केली. त्यावेळी पंच क्रमांक 01 श्री.अ राकडे यांचे समक्ष बिट जमादार श्री. नागरे यांनी उजव्या हाताचा अंगठा व तर्जनी एकमेकावरती घासुन माझ्याकडे पाहुन पोलीस अंमलदार श्री. भानुसे यांना पैसेमागण्याबाबत इशारा केला. त्यानंतर " मी येवु का पंधरा मिनिटात " असे म्हणाले. तेव्हा त्यांना पोलीस अंमलदार भानुसे म्हणाले, " काय करायचे " तेव्हा बिट जमादार नागरे म्हणाले काय करता " तेव्हा पोलीस अंमलदार श्री. भानुसे त्यांना म्हणाले, " सांगा ना " . त्यावेळी बिट जमादार नागरे पोलीस अंमलदार श्री. भानुसे यांना म्हणाले की, " तुम्ही जातानाच म्हणाय लागले, काय करायच मग अर्ध्या पासु काय करुन टाका, करुन टाका न कशाला टेंशन घ्यायच, टेंशन काही नाही " असे म्हणाले. त्यावेळी पोलीस अंमलदार श्री. भानुसे म्हणाले की, विसच्या आत करतो. त्यावेळी बिट जमादार नागरे पोलीस अंमलदार श्री. भानु यांना म्हणाले की, " येतो नंतर, करुन टाका, करुन टाका काय टेंशन नाही,जामिन दिली त्यायला तेच परवडत इथल्या इथ पळु द्या. काही हरकत नाही, आता आता नाही पळणार, चालत काही हरकत नाही " असे म्हण त्यानंतर पोलीस अंमलदार श्री. भानुसे यांनी मला " तुम्ही येथे रुम मध्ये बसा " असे सांगुन बाकी सर्वाना त्यांचे मधुन बाहेर जाण्यास सांगितले. तेव्हा मी पंच श्री.राकडे यांना " भागवतराव थांबा बाहेर साहेब म्हणतात " असे म्हणुन बाहेर जाण्यास सांगितले तेव्हा रुम मधुन सर्वजन बाहेर गेले असता त्यावेळी पोलीस अंमलदार श्री. भानुसे यांनी त्यांचे हातातील मोबाईल वरती 30,000/- रुपयेअसे टाईप करुन " जे हय ते करा "असे मला म्हणाले. त्यावेळी मी मोबाईल मधील टाईप केलेले 30,000/- आकडा पाहुन " तीस हजार "असे म्हणालो.त्यावेळी पो अंमलदार श्री. भानुसे साहेब " ह " असे म्हणाले.तेव्हा मी त्यांना " लय झाले ना साहेब " असे म्हणालो. त्या

पोलीस अंमलदार श्री. भानुसे यांनी " तुमच्या समोर हय, मी बोलत नाही, काही नाही, साहेबांन जे सांगीतल हे बघ तीस " असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना 30,000/- हजार सांगीतल.. " गाडी सुटन कधी आता " असे म्हणालो. त्यावेळी पोलीस अंमलदार श्री. भानुसे मला म्हणाले की, " तुम्हीच सांगा यात काय देता ". त्यावेळी मी त्यांना " बघा कमीत कमी काय वीस हजार " असे म्हणालो. माझे व पोलीस अंमलदार श्री. भानुसे यांचे बोलणे चालु असताना श्री. भानुसे साहेब बसलेल्या रुम मध्ये बाळु खंदारे व वामन खंदारे हे दोघे जण आले.त्यावेळी पोलीस अंमलदार श्री. भानुसे साहेब यांनी त्यांचे मोबाईल फोन मधील फोन पे प बोटाव्दारे मला दाखवुन वामन खंदारे यांच्याकडे फोन पे व्दारे पैसे पाठविण्याचाबोटाव्दारे मला इशारा केला. त्यानंतर मी त्या दोघांना बर तुम्ही दोन मिनिट बाहेर थांबा ना, मला बोलुन दया असे म्हणालो.त्यावेळी ते दोघे रुम बाहेर गेले. त्यानंतर पोलीस अंमलदार श्री. भानुसे मला म्हणाले की, " तुझा काय वीस मध्ये ". त्यावेळी मी त्यांना " वीस मध्ये " असे म्हणालो त्यावेळी श्री. भानुसे साहेब " ह " असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना " वीस हजार फिक्स का,मव्ह म्हणण हय पंधरा मध्ये मी लय दवाखाना करुन आलोय " असे म्हणालो. त्यावेळी पोलीस अंमलदार श्री. भानुसे मला म्हणाले की, " जास्त घेणार नाही, ऐका माझ ". तेव्हा मी श्री. भानुसे यांना म्हणालो की, " दवाखाण्यातुन आलोय निघाय पैसे नाही ". त्यावेळी पोलीस अंमलदार श्री. भानुसे मला म्हणाले की, " ते नागरे साहेबाचेच हय, ते त्यायला सांग माझ्या मनात हायच नाही " असे म्हणाले. त्यावेळी मी पोलीस अंमलदार श्री. भानुसे यांना म्हणालो की, " मला काल तीस हजार लागले न काल मी खरोखर अडकलेत जर असते तर मी तुम्हाला शब्दही ऐकु दिला नाही की, पंधरा हजार द्या. वीस दया, पंचवीस कधी म्हणलय तिकड एक केला " असे म्हणालो त्यावेळी श्री. भानुसे " नाय " असे म्हणाले. त्यानंतर मी पोलीस अंमलदार श्री. भानुसे यांना " माझं म्हणण हय पंधरा हजारामध्ये भानुसे साहेब " असे म्हणालो. त्यावेळी " ह अवघड होत " असे श्री.भानुसे म्हणाले. त्यावेळी मी पोलीस अंमलदार श्री.. भानुसे यांना " आता माझ एवढ सांगीतल तुम्हाला सध्या नाहीत बर सोबत " असे म्हणालो त्यावेळी मला श्री.भानुसे म्हणाले की, " नाही तस करु नका, लगेच ..लगेच.. लगेच नाही त मंग नंतर नाय बघ " असे म्हणाले. त्यानंतर मी रुमच्या बाहेर येऊन माझा भाऊ अशोक व पंच क्रमांक 01श्री.राकडे यांना साहेब पधरा हजार रुपये मागत असुन त्यांनी वामन खंदारे यांच्या फोन पे वरती पंधरा हजार रुपये रक्कम देण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्र.01 श्री.राकडे असे पोलीस निरीक्षक मुटेकर साहेब यांचेकडे परत आलो परंतु सीसीटीएनएस मध्ये शब्द मर्यादा असल्याने फिर्याद सोबत जोडत आहोत.

**3. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध धडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

yogesh eknath khatkal(I (Inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

N.C.R.B (एन.सी.आ
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉ

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correct
recorded and a copy given to the complainant / informant free of cost
खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि
तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the
complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Shinde
01/02/2025 417 ৪/৫

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंम

Signature of Officer in C
Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्ष

Name (नाव): yogesh ekn
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.):